http://www.sgbauonline.com/



# M.A. Part–I (Semester–I) Examination
## MARATHI
## Paper–4(A)
## Vishesh Wangmay Prakar (Kavita)

वेळ : 3 तास] [गुण : 80

**सूचना :—** (1) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

(2) वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिल्यास मूल्यांकनासाठी पहिले उत्तर ग्राह्य धरण्यात येईल.

1. पुढील काव्यपंक्तीचा संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा :

(अ) जुने जाउ द्या मरणालागुनि;
जाळूनि किंवा पुरुनी टाका;
सडत न एक्या ठायी ठाका;
सावध ! ऐका पुढच्या हाका;
खांद्यास चला खांदा भिडवुनि

**किंवा**

हेवा तयांचा मजला मुळी नसे,
जाडी मला भाकर ती पुरी असे;
कष्टात देवा ! मरण्यास तत्पर,
का मारिसी हाय ! भुकेमुळे तर ?

(ब) मन जह्यरी जह्यरी
याचं न्यारं रे तंतर
अरे, इचु, साप बरा
त्याले उतारे मंतर !

**किंवा**

ज्याच्यामधी नही भाव
त्याले भक्ती म्हनू नही
ज्याच्यामधी नही चेव
त्याले शक्ती म्हनू नही

(क) पंगु लंघे हिमगिरी । नाव चाले जळोदरी;
जीव पैशाला पासरी । अणु-युगीं ।।

**किंवा**

ह्या गंगेमधि गगण वितळले,
शुभाशुभाचा फिटे किनारा;
अर्ध्या हाकेवरी उतरला
बुद्ध गयेचा पिवळा वारा.

(ड) "ले पकड रस्सी - हां - खेच, डरता है ? क्या बम्मन का बेटा
हैरे तू साले मजदूर है अपन; पकड घोडे को;
हां, यह, वाह रे मेरे छोटे नाल वाले,"

**किंवा**

ते रुद्राक्ष, पोथ्या, ते खुंटीवर टांगलेले देव
काळच म्हणालीस, "कुणीही भले केलेले नाही"



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

2. "केशवसुतांची कविता स्वातंत्र्य, समता, व बंधुता या मूल्यांचा आग्रह धरते" कवितेच्या आधारे मूल्यमापन करा.

किंवा

प्राचीन कवितेपेक्षा अर्वाचीन कवितेचे वेगळेपण केशवसुतांच्या कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

3. बहिणाबाई चौधरी यांच्या काव्याची वैशिष्ट्ये विशद करा.

किंवा

मर्ढेकरांच्या काव्यातील आध्यात्मिक जाणीव स्पष्ट करा.

4. 'कामगार वर्गाच्या सुखदुःखाचे वास्तव चित्रण नारायण सुर्वेच्या कवितेचा गाभा आहे' या विधानाची साधार चर्चा करा.

किंवा

नारायण सुर्वे हा केवळ साम्यवादी कवितेचाच नव्हे तर एकूण मराठी कवितेचा महत्वपूर्ण टप्पा कसा आहे, ते स्पष्ट करा.

5. वस्तुनिष्ठ प्रश्नांचे योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा :
(उदाहरण - प्र.क्र. 1 - (ड) लोकमान्य टिळक)

(1) केशवसुतांचे पूर्ण नाव :
(अ) केशव कृष्णाजी दामले (ब) कृष्णाजी केशव दामले
(क) केशवकुमार (ड) केशवराव मधुकर दामले

(2) 'झपूर्झा' या कवितेचा प्रमुख्याने आशय कोणता ?
(अ) गूढगुंजन (ब) निर्मितीप्रक्रिया
(क) स्वप्नरंजन (ड) सामाजिकता

(3) नवकवितेचे जनक म्हणून कोणत्या कवीला ओळखले जाते ?
(अ) केशवसुत (ब) मर्ढेकर
(क) नारायण सुर्वे (ड) बहिणाबाई चौधरी

(4) 'ह्या गंगेमधि गगन वितळलें' ही कविता कोणाची :
(अ) नारायण सुर्वे (ब) केशवसुत
(क) कुसुमाग्रज (ड) मर्ढेकर

(5) बहिणाबाई चौधरी यांच्या पुत्राचे नाव :
(अ) मधुकरराव चौधरी (ब) महादेव चौधरी
(क) सोपानदेव चौधरी (ड) मोहन चौधरी

(6) 'लपे करमाची रेखा । माझ्या ............ खाली । पुशीसनी गेलं कुंकू । रेखा उघडी पडली'
रिकाम्या जागी असलेला शब्द —
(अ) पदराच्या (ब) कपाळाच्या
(क) कुंतलाच्या (ड) कुंकवाच्या

(7) नारायण सुर्वे यांच्या वडिलांचे नाव :
(अ) गंगाधर (ब) गणपती
(क) गंगाराम (ड) गजानन

(8) 'कामगार आहे ........................ सारस्वतांनो थोडासा गुन्हा करणार आहे.
(अ) मी तळपती तलवार आहे (ब) मी तळपते खड्ग आहे
(क) मी तळपती राजमुद्रा आहे (ड) मी उमडते तुफान आहे.



http://www.sgbauonline.com/